# दिनांक 11/04/2025

**1.** पेण पोलीस ठाणे हद्दीत दिनांक09/04/2025 रोजी 03:00 वा च्या सुमारास मौजे पेण शहराजवळील गोवा ते मुंबई महामार्ग तरणखोप हायवे हॉटलचे जवळ ता पेण येथे आरोपी क्र 1 हा कंपनीचे ट्रकवर चालक असुन आरोपीत 1 याचे ताब्यात फिर्यादीने विश्ववासाने ट्रान्सपोटीग साठी दिलेल्या जेएसडब्ल्यु कंपनीचे लोखंडी सळईची वाहतुक करताना त्याचे ताब्यातील वाहनावरील 25 एम. एम. च्या 40 फुट लांबीच्या 31 लोखंडी सळई अंदाजे कि 95,000/- रुपये किंमतीच्या परस्पर काढुन अपहार करुन आरोपीत क. 2 यास दिल्या.

याबाबत पेण पोलीस ठाणे गुरनं. 67/2025 भा.दं.वि.क. 316 , 317(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/सचिन व्हसकोटी हे करीत आहेत.

**2.** पोलादपूर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 09/04/2025 रोजी 22:15 वा च्या सुमारास मौजे लोहारमाळ गावचे हददीत शिवराज बियर शॉपीच्या समोरील मुंबई गोवा हायवे रोडवर ता.पोलादपूर येथे फिर्यादी रा. ताबंडभुवन पोलादपुर ता.पोलादपुर यांचा भाचा हा त्याचे ताब्यातील ॲक्टीव्हा गाडी नं एम एच 06 सी जी 4955 हीचे वरुन पत्नी व दोन मुले असे लोहारमाळ ते पोलादपुर मुबई गोवा हायवे ने येत असताना पाठीमागुन येणारा आयशर टॅम्पो क्र.एम.मच.07 अे.जे 2210 हिचेवरील आरोपी चालक रा.मिठबाग ता.देवगड जि.सिधुदुर्ग याने त्याचे ताब्यातील वाहन अतिवेगाने रस्त्याचे परिस्थीतीकडे दुर्लक्ष करुन ॲक्टीव्हा गाडीला डाव्या बाजुने ओव्हरटेक करत असताना ॲक्टीव्हा गाडीचे डाव्या बाजुला ठोकर मारुन जखमी 1) सुनिल सुरेश पवार, 2) सुवर्णा सुनिल पवार, 3) श्लोक सुनिल पवार, 4) रिया सुनिल पवार याचे लहान मोठया दुखापतीस व दोन्ही वाहनाचे नुसकाणीस कारणीभुत झाला.

याबाबत पोलादपूर पोलीस ठाणे गुरनं.21/2025 भा.दं.वि.क. 281, BNS 281, 125(a), 125(b),184, मोटार वाहन अधिनियम, 1988 चे कलम 184 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोहवा/रवींद्र सर्णेकर हे करीत आहेत.

**3.** महाड (शहर) पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 09/04/2025 रोजी 18:30 वा च्या सुमारास मौजे मोहोप्रे गावच्या हददीत, महाड येथे फिर्यादी रा. केंबुर्लीए महाड ता महाड हे त्याच्या ताब्यातील यमाहा फेजर मोटारसायकल नं एएम एच.06 बीएफ 0216 ही वर सोबत साक्षीदार यास घेवून महाड बाजुकडून मुंबई बाजूकडै मुंबई गोवा हायवे रोडने जात असताना मोहपे्र गावचे हददीत आलेवेळी आरोपी चालक रा भोमजाई महाड ता महाड याने आपल्या ताब्यतील

मोटारसायकल नं एम एच.06 सीई 9218 ही अतिवेगात बेदरकारपनाणे रस्त्याच्या परिस्थीतीकडै दुर्लक्ष करून चालवून मुंबई बाजुकडून महाड बाजूकडे रॉंग साईड लेन ने येवून फिर्यादी याचे मोटारसायकल नं एएम एच.06 बीएफ 0216 ला ठोकर मारून अपघात करून अपघातात फिर्यादी व साक्षीदार तसेच स्वत:चे लहान मोठया स्वरूपाचे दुखापतीस तसेच दोन्ही वाहनाचे नुकसानीस कारणीभूत झाला.

याबाबत महाड (शहर) पोलीस ठाणे गुरनं. 33/2025, मोटार वाहन अधिनियम, 1988चे कलम 184, भारतीय न्याय संहीता 2023चे कलम 125 a...125b...281 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोना/शेख, हे करीत आहेत.

**4.** पेण पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 09/04/2025 रोजी 19:00 वा च्या सुमारास मौजे शहापाडा धरण आदीवासीवाडी ता पेण फिर्यादी यांचे राहते घरात, ता-पेण येथे फिर्यादी यांनी त्यांचे ओळखीचे असलेला साक्षीदार याला फोन लावण्याऐवजी चुकुन आरोपी हिला फोन लावला त्या गोष्टीचा आरोपीला राग येवुन ती फिर्यादी यांचे घरात अनधिकृतपणे घुसुन त माझे फोन वर फोन करुन माझे नव-याला दारु पिण्यासाठी बोलावतोस काय? असा गैरसमज करुन फिर्यादी व त्यांची पत्नी हिस शिवीगाळ करुन अधांरात कोणतीतरी कठीण टोकदार वस्तु उचलुन फिर्यादी यांचे डोक्याचे पाठीमागील बाजुस मारुन दुखापत केली.

याबाबत पेण पोलीस ठाणे गुरनं. 68/2025 भा.दं.वि.क. 118, 333, 352 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोह/पुष्पा वाघमारे ह्या करीत आहेत.

**5.** रोहा पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 10/04/2025 रोजी 08:30 वा च्या सुमारास मौजे तळाघर येथे ता रोहा येथे आरोपीत क्र.1 हे फिर्यादी रा तळाघर पो वरसे ता रोहा यांचे आवाराचे जागेला लावलेला लाकडी ओडका ढकलत असताना फिर्यादी यांनी लाकडी ओडका कशाला ढकलता असे बोलला असता त्याचा आरोपीत क्र 1 यास राग येवुन त्यांनी चालण्यासाठी वापरत असलेल्या काठीने फिर्यादी यांच्या डोक्याचे उजवे बाजुस झोड मारून दुखापत केली त्याचवेळी आरोपी क्र 2 व 3 तेथे येवुन संगणमत करून फिर्यादी यास शिवीगाळ दमदाटी करून ठार मारण्याची धमकी दिली.

याबाबत रोहा पोलीस ठाणे गुरनं.70/2025, भारतीय न्याय संहिता कलम 118(1), 352, 351(2),3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोहवा/श्रीधर अधिकारी, हे करीत आहेत.

**6.** माणगाव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 01/05/2024 रोजी 00:00 वा ते दि. 09/04/2025 रोजी 00:00 वा च्या दरम्यान आरोपीत व महिला पिडीत/फिर्यादी हे एकमेकांचे नातेवाईक आहेत. आरोपी हे मे 2024 पासुन फिर्यादी हीच्या घरीच तीचे सोबत राहत होता. आरोपी याने फिर्यादी ही अल्पवयीन असल्याचे माहीत असताना देखील फिर्यादी हिचेसोबत तीचे इच्छेविरुध्द वारंवार शारिरीक संबंध ठेवले व फिर्यादी हिस गरोदर केले त्यातुन तिस एक मुलगी झाली आहे.

याबाबत माणगाव पोलीस ठाणे गुरनं.78/2025, बाल लै. अत्या. संरक्षण (POCSO)

अधिनियम, 2012 चे कलम 4, 5, 5(j)(2), 5(L), 6, भारतीय न्याय संहिता कलम 64, 64(2)(i), 64(2)(m) 65(1) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सपोनि श्री बेलदार , हे करीत आहेत.

**7.** खोपोली पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 10/04/2025 रोजी 14:30 वा च्या सुमारास मौजे जाबंरूग गावचे हददीत ता.खालापुर येथे फिर्यादी व साक्षिदार हे त्याचे वडिलोपार्जित शेता मध्ये लेबरचे मदतीने मोजणी केलेल्या जागेला सिंमेट पोलचे तार कंपाउंडचे काम करीत असताना आरोपीत नंबर 1,2,3 रा.मु.पो.जाबंरूग ता.खालापुर असे तेथे जावुन तार कंपाउंडसाठी खोदलेल्या खड्यात माती टाकून काम करण्यास विरोध करून आरोपीत नंबर 01 याने त्याचे सोबत आणलेल्या लोखंडी फायटरने फिर्यादी यांना डावे कानाच्या वरील बाजुस, डोक्यास फाईट मारून व साक्षिदार नंबर 2 यांना गालावर व साक्षिदार 3 यांना उजव्या पायाच्या गुडघ्याच्या खाली लोखंडी फायटरने फाईट मारून दुखापत करून आरोपीत नंबर 2 व 3 याने फिर्यादी व साक्षिदार यांना हाताबुक्याने मारहाण करून शिवीगाळी दमदाटी केली.

याबाबत खोपोली पोलीस ठाणे गुरनं.99/2025, भारतीय न्याय संहिता कायदा 2023 118(1),115(2),352,351(2),3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोह/सरिता परदेशी ,ह्या करीत आहेत.

**8.** खोपोली पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 10/04/2025 रोजी 14:30 वा च्या सुमारास मौजे जाबंरूग गावचे हददीत खोपोली ता.खालापुर येथे फिर्यादि व साक्षिदार व विरोधक यांच्यात शेतात कंपाऊंड घालण्याचे जागेवरून वाद झाला होता सदर वादावरून दिनांक 10/04/2025 रोजी सकाळी 12.45 वाजता च्या सुमारास खोपोली पोलीस ठाणे बीएनएस 2023 चे कलम दाखल आहे. फिर्यादि व साक्षिदार हे त्यांचे शेतात कंपाऊंडचे काम करीत असलेल्या विरोधक नंबर 1 ते 4 यांना भेटून तुम्ही येथे कंपाऊंडचे काम करू नका ही आमची जागा आहे. आपण काही तरी मार्ग काढू असे समजावुन सांगण्यासाठी गेले असता विरोधक क्रमांक 1 याने काहीएक न ऐकता फिर्यादी यांच्या अंगावर धावत जावुन हातात असलेला दगड डोव्यावर मारून दुखापत करून पडीक जमिनीत ढकलून देवुन विरोधक नंबर1 ते 4 यानी साक्षिदार नंबर 2 व 3 यांना हाताबुक्याने मारहाण करून शिवीगाळी जिवेठार मारण्याची धमकी दिली.

याबाबत खोपोली पोलीस ठाणे गुरनं. 100/2025, भारतीय न्याय संहीता कलम 118(1), 115(2), 352, 351(2), 3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोह/ सरिता परदेशी , हे करीत आहेत.

**9.** महाड (शहर) पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 10/04/2025 रोजी 19:00 वा वा च्या सुमारास मौजे कोळोसे गावचे हददीत महाड ते रायगड रोड वर ता.महाड येथे पादचारी मयत इसम ) श्री.भीम रघुनाथ ढानिफकर रा- कुंभारकोंड नाते ता महाड हा रस्ता कॅास करीत असताना आरोपीत चालक रा. खडी फाटा चाफगाव ता. महाड हा महाड ते खडी असे आपली मोटार सायकल नं एम एच 06 बीके 8959 ही स्वत: चालवित येवून जात असताना मौजे कोळोसे

गावच्या हददीत आलेवेळी आपली मोटारसायकल अतिवेगाने चालवून रस्त्याचे परिस्थीतीकडे दुर्लक्ष करून पादचारी इसमास ठोकर मारून अपघात करून पादचारी इसमाच्या डोक्याला गंभीर दुखापत करून पादचारी इसमाचे मृत्यूस कारणीभुत झाला तसेच स्वत: चे व साक्षीदाराचे लहान मोठया दुखापतीस कारणीभुत झाला.

याबाबत महाड (शहर) पोलीस ठाणे गुरनं. 34/2025, मोटार वाहन अधिनियम, 1988 184, भारतीय न्यास संहीता कलम 106,281,125 A,125 B प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई वालकोळी, हे करीत आहेत.

## वाहतूक केसेस

दिनांक 10.04.2025 रोजी 28 पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण 15 इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून 26,500/-रुपये इतका दंड आकारला आहे.